# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025


Original Article

# भारतीय कृषी विविधतेचा भौगोलिक अभ्यास


**प्रा. डॉ. राजाराम महादेव थोरात**

भूगोल विभाग प्रमुख, द.ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, तळा, ता. तळा, जिल्हा रायगड

**Email**: rmthorat74@gmail.com



**Manuscript ID**:

JRD -2025-171120

ISSN: 2230-9578

Volume 17

Issue 11(A)

Pp. 119-123

November. 2025

**Submitted:** 17 Oct. 2025

**Revised:** 27 Oct. 2025

**Accepted:** 10 Nov. 2025

**Published:** 30 Nov. 2025



***सारांश***

*भारत हा एक शेतीप्रधान देश असून गेली कित्येक वर्षे शेती हाच भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा राहिला आहे. देशातील एकूण लोकसंख्येपैकी ६७ टक्के लोक ग्रामीण भागात राहतात. या लोकसंख्येपैकी ६५ टक्क्यांहून अधिक लोक उदरनिर्वाहासाठी शेतीवर अवलंबून आहेत. देशातील ५५ टक्क्यांहून अधिक श्रमिक शेतीव्यवसायात गुंतलेले असून आपल्या स्थूल राष्ट्रीय उत्पादनात शेतीक्षेत्राचा वाटा १८.४० टक्के इतका मोठा आहे.आजही आपल्या एकूण निर्यातीत चहा, कॉफी, तांदूळ, ताग, तंबाखू, रबर व मसाल्याचे पदार्थ यांसारख्या कृषिउत्पादनांचा वाटा महत्त्वाचा आहे. भारताच्या एकूण निर्यात किमतीत कृषी व कृषीवर आधारित उत्पादनांचा वाटा ११ टक्क्यांहून अधिक आहे.भारताच्या एकूण निर्यातीत कृषिक्षेत्राचा असलेला हा सहभाग या क्षेत्राचे भारतीय अर्थव्यवस्थेत असलेले महत्त्वाचे स्थान स्पष्ट करतो.*

*भारताच्या औद्योगिक विकासात कृषिवर आधारित उद्योगांना महत्त्वाचे स्थान आहे.देशाचा औद्योगिक विकास झपाट्याने होत असला तरी तो विकसित राष्ट्रांशी तुलना करता खूपच मर्यादित स्वरूपाचा असून देशातील प्रचंड लोकसंख्येच्या जीवनावश्यक गरजा भागविण्यास तसेच वाढत्या लोकसंख्येस रोजगार पुरविण्यास औद्योगिक क्षेत्र आजही सक्षम नाही. अशा परिस्थितीत वाढत्या लोकसंख्येला रोजगार पुरवण्याची जबाबदारी कृषी क्षेत्रावरच पडत आहे. अनेक बेरोजगार कृषी क्षेत्राच्या विकासामळे उभ्या राहिलेल्या कृषि आधारित उद्योगांमध्ये सामावले गेले आहेत. कृषी क्षेत्रात घडून आलेल्या हरितक्रांतीमुळे वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची व वस्त्रांची गरज आपल्या कृषी क्षेत्राने यशस्वीरीत्या भागविली आहे. कृषिआधारित उद्योग देशातच उभे राहिल्यामुळे अशा उद्योगांतून निर्माण होणाऱ्या वस्तूंची आयातही कमी झाली व त्यातून दुर्मिळ असे परकीय चलन आपणास वाचविता आले.*



***बीज संज्ञा:*** *मंडई बागायती, हरितक्रांती, धवल क्रांती, फळ प्रक्रिया, सेंद्रिय शेती, कृषी पर्यटन, संकरित बियाणे.*


## प्रस्तावना

भारत हा उत्तर गोलार्धातील आशिया खंडात असणारा एक महत्त्वपूर्ण देश आहे. भारतीय शेती मान्सूनच्या लहरी पावसावरील जुगार समजली जाते. मान्सूनचा लहरी पाऊस कधीही वेळेवर, नियमित आणि भरपूर प्रमाणात पडत नाही. त्यामुळे दुष्काळ हा शेतकऱ्यांच्या पाचवीला पुजलेला आहे असे काही अर्थशास्त्रज्ञ म्हणतात. देशातील एकूण भूमीचा विविध भौगोलिक घटकांसाठी झालेला वापर म्हणजे भूमिउपयोग होय. भूमिउपयोगावर प्राकृतिक रचना व आर्थिक विकास यांचा परिणाम होत असल्याचे दिसून येते.भारताचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ ३२,८७,२६४ चौरस किलोमीटर इतके असून त्यापैकी ६० टक्के क्षेत्र निव्वळ पेरणीखाली आहे. पिकांखालील एकूण क्षेत्राच्या ५२ टक्के क्षेत्र ओलिताखाली आहे. लागवडीखालील अथवा पिकांखालील एकूण क्षेत्राच्या जवळजवळ ६७ टक्के क्षेत्र अन्नधान्य पिकाखाली आहे.


***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*



Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI: 10.5281/zenodo.17877279

OPEN ACCESS



**Address for correspondence:**

*प्रा. डॉ. राजाराम महादेव थोरात, भूगोल विभाग प्रमुख, द.ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, तळा, ता. तळा, जिल्हा रायगड*



**How to cite this article:**

*थोरात, . राजाराम . महादेव . (2025). भारतीय कृषी विविधतेचा भौगोलिक अभ्यास. Journal of Research and Development, 17(11(A)), 119–123. https://doi.org/10.5281/zenodo.17877279.*

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025

राज्यांच्या एकूण क्षेत्रफळापैकी पंजाब, हरियाणामध्ये प्रत्येकी ८१ टक्के, पश्चिम बंगालमध्ये ६३ टक्के, महाराष्ट्रात ६० टक्के, विभाजनपूर्व उत्तर प्रदेशात ५८ टक्के तर केरळमध्ये ५६ टक्के जमीन कृषिखाली आहे. कृषिखाली अतिकमी क्षेत्र असलेल्या राज्यांत अरुणाचल प्रदेश, नागालँड, मेघालय, मिझोराम या राज्यांचा समावेश होतो. अंदमान-निकोबार या संघराज्य प्रदेशातही कृषिक्षेत्र खूपच कमी आहे, बिहार, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश आणि पंजाबमध्ये दुबार व तिबार पिकाखालील क्षेत्र अधिक आहे. दख्खनचे पठार, माळव्याचे पठार, राजस्थानचा पश्चिम भाग येथे दुबार पिकांचे प्रमाण कमी आहे. पिकाखालील क्षेत्राप्रमाणे इतर कारणांसाठी देखील भूमिउपयोग होतो.

**शेतीचे प्रकार**

भारतामध्ये प्राकृतिक रचनेत विविधता आहे. तसेच ऋतू आणि अक्षांशाला अनुसरून हवामानातील विविध आविष्कारांतही विभिन्नता आहे. भारतात मृदेचे वेगवेगळे प्रकार आढळून येतात. त्यामुळे साहजिकच भारतात एकाच प्रकारची शेती करणे शक्य होत नाही. मशागत करण्याच्या पद्धतीमध्ये प्रादेशिक घटकांचा मुख्यत्वेकरून प्रभाव पडतो.त्यामुळेच भारतात शेतीचे अनेक प्रकार आढळतात. स्थानिक नैसर्गिक परिस्थितीला अनुसरून देशाच्या वेगवेगळया भागांत वेगवेगळया प्रकारची शेती केली जाते.

- **स्थलांतरित शेती**

भारतातील ही शेतीपद्धत अत्यंत प्राथमिक स्वरूपाची आहे. हा देशातील पारंपरिक शेतीप्रकार गणला जातो. या प्रकारची शेती करण्यामागे फक्त पोट भरणे हाच उद्देश असतो. अरण्यात व पर्वतमय प्रदेशांत राहणाऱ्या आदिवासी आणि वन्य जमाती या प्रकारची शेती करतात. अशा प्रकारची शेती वेगवेगळया प्रदेशांत निरनिराळया नावांनी ओळखली जाते. उदा.आसाम व नागालँडमध्ये 'झूम', केरळमध्ये 'पोणम', आंध्र प्रदेशात व ओरिसात 'पाडू', छत्तीसगढमध्ये 'बेवार', हिमालयात 'खिल', पश्चिम घाटात 'कुमरी' या नावाने स्थलांतरित शेती ओळखली जाते.या शेतीप्रकारात जंगल साफ करून त्या ठिकाणी पारंपरिक पद्धतीने शेती केली जाते. या शेतीसाठी अगदी प्राथमिक स्वरूपाची परंपरागत अवजारे वापरली जातात. शेतीची मशागत, पेरणी, कापणी, पिकांची वाहतूक वगैरे सर्व कामे मानवी श्रमाच्या साहाय्यानेच केली जातात. काठयांनी जमिनीत भोके पाडून त्यांत बी टाकून पेरणी केली जाते. यात खतांचा वापर, जलसिंचन किंवा सुधारित बी-बियाण्यांचा वापर होत नसल्याने पिकांचे उत्पादन फारच कमी येते. स्थलांतरित शेतीमधून आदिवासींना अन्नधान्याचे पुरेसे उत्पादन मिळू शकत नाही. त्यामुळे ते प्राण्यांची शिकार करणे, मासेमारी करणे, वन्य पदार्थ गोळा करणे इत्यादी व्यवसाय त्यांना करावे लागतात. बरेच लोक शेळया, बदके,कोंबड्या पाळतात.स्थलांतरित शेतीमुळे जंगलतोड मोठ्या प्रमाणावर होते. जंगलतोडीमुळे जमिनीची धूप होण्याचे प्रमाण वाढते, हे अनिष्ट परिणाम लक्षात घेऊन या प्रकारच्या शेतीस प्रतिबंध करण्याचे धोरण अनुसरण्यात येत आहे. आजही आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, त्रिपुरा, मिझोराम, अरुणाचल प्रदेश यांसारख्या ईशान्येकडील राज्यांत स्थलांतरित शेती मोठ्या प्रमाणावर केली जाते.आदिवासी लोकांना स्थलांतरित शेतीपासून परावृत्त करण्याच्या दृष्टीने त्यांना चहा, कॉफी, रबर, काजू, केळी, संत्री, अननस किंवा मसाल्याच्या पिकांची लागवड करण्याच्या दृष्टीने प्रशिक्षित करणे गरजेचे आहे.

- **सखोल उदरनिर्वाह शेती**

भारतात सखोल उदरनिर्वाह शेतीचे क्षेत्र फार मोठे आणि सर्वत्र विखुरलेले आढळते. वाढती लोकसंख्या व मर्यादित शेतजमीन यांमुळे या प्रकारची शेती मोठ्या प्रमाणावर केली जाते. उदरनिर्वाह हा या शेतीपद्धतीचा मुख्य उद्देश असल्यामुळे या शेतीत प्रामुख्याने तांदूळ,गहू, ज्वारी, बाजरी या खाद्यान्न पिकांचे उत्पादन घेतले जाते. या शेतीप्रकारात मोठ्या लोकसंख्येचे पोट भरण्याच्या गरजेतून एका जमिनीतून वर्षातून दोन ते तीन पिके घेतली जातात. शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे वाढते प्रमाण व त्यातून होणारे तुकडीकरण यांमुळे शेतांचे आकार लहान असतात. बांधांमध्ये बरेच क्षेत्र वाया जाते व यांत्रिक अवजारांचा वापर फारसा करता येत नाही. जमीन कसण्यासाठी काही प्रमाणात पशुधनाचा उपयोग करून घेतला जातो. लोकसंख्या दाट असल्याने या शेतीत मनुष्यबळाचा जास्तीत वापर करून घेतला जातो. दरडोई शेतजमिनीचे प्रमाण कमी असल्याने तसेच त्यावर अवलंबित लोक जास्त असल्याने जमिनीचा वापरही जास्तीत जास्त केला जातो.या शेतीपद्धतीत आधुनिक अवजारांचा व पद्धतींचा अवलंब फारसा केला जात नाही. कारण ही शेती करणारा शेतकरी आर्थिकदृष्ट्या मागासलेला असतो. पारंपरिक पेरणी पद्धत,जलसिंचनाच्या सोयीचा अभाव, रासायनिक खतांचा व जंतुनाशकांचा अत्यल्प वापर, मोसमी पावसावर आधारित खाद्यान्न लागवड ही या शेतीप्रकाराची मुख्य वैशिष्ट्ये होत. उदरनिर्वाह हाच या प्रकारच्या शेतीमागील प्रमुख उद्देश असल्याने शेतीतील उत्पादने बाजारपेठेत फारशी विकली जात नाहीत. त्यामुळे या शेतीस आर्थिकदृष्ट्या फारसे महत्त्व प्राप्त झालेले नाही.पंजाब, हरियाणासारखी कृषी क्षेत्रातील पुढारलेली राज्ये व अगदी दुर्गम डोंगराळ प्रदेश वगळता देशात सर्वत्र या प्रकारची शेती प्रचलित आहे. या प्रकारच्या शेतीत शेतीचा आकार लहान असतो पण त्यावर अवलंबित लोक

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025

अधिक असतात. त्यामुळे साहजिकच दरहेक्टरी उत्पादन जास्त असले तरी दरडोई उत्पादन अतिशय कमी असते. सखोल शेतीपद्धतीमध्ये मृदेच्या सुपीकतेचा ऱ्हास होतो.

- **मळयाची शेती**

भारतात सर्वप्रथम यूरोपीयन लोकांनी वसाहती स्थापन केल्यानंतर त्यांनी भारतात मळयाची शेती सुरू केली. शेतीचा हा आधुनिक प्रकार आहे. सुरुवातीस ब्रिटिश उद्योजकांच्या हाती असलेले हे मळे आता भारतीय जमीनदारांच्या मालकीचे झाले आहेत. मोठमोठ्या शेतात प्रामुख्याने नगदी पिके पिकवली जातात, तेव्हा त्या शेतीला 'मळयाची शेती' असे म्हणतात.भारताच्या अर्थव्यवस्थेत मळे शेतीतील पिकांना महत्त्वाचे स्थान आहे. जरी या पिकांनी कमी क्षेत्र व्यापले असले तरी त्यापासून मिळणारी उत्पादने देशाच्या अंतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय व्यापारात महत्त्वाचा वाटा उचलतात. भारतामध्ये ऊस, चहा, कॉफी व रबर ही महत्त्वाची पिके मळयाच्या शेतीतून घेतली जातात. याशिवाय मसाल्याचे पदार्थ, कोको इत्यादी पिकांचे उत्पादनही कमी-अधिक प्रमाणात मळयांच्या शेतीतून घेतले जाते. भारतात सुमारे ३०,००० पेक्षा अधिक मळे आहेत. भारतातील उष्ण व दमट हवामानाच्या प्रदेशात या प्रकारच्या शेतीचा प्रचार-प्रसार अधिक झालेला आहे, आसाम, पश्चिम बंगाल, कर्नाटक, केरळ, तमिळनाडू, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश या राज्यांत तुलनात्मकदृष्टधा मळे शेती मोठ्या प्रमाणावर केली जाते.

चहा हे भारतातील मळे शेतीत घेतले जाणारे प्रमुख पीक असून चहा-उत्पादनात भारताचा जगात पहिला क्रमांक लागतो. आसाम, पश्चिम बंगाल व हिमाचल प्रदेशात चहाचे प्रमुख उत्पादक-क्षेत्र आहे. याशिवाय तमिळनाडू व केरळमध्येही चहाचे उत्पादन घेतले जाते. कर्नाटक, तमिळनाडू व केरळमध्ये कॉफीचे मळे आहेत. रबराचे उत्पादन केरळ, कर्नाटक , तमिळनाडू या राज्यांत घेतले जाते. उसाचे उत्पादन उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, बिहार, तमिळनाडू, कर्नाटक, पंजाब व हरियाणा या राज्यांत होते.भारतात मळे पद्धतीचा विकास झालेला आहे. या प्रकारच्या शेतीत उत्तम प्रतीच्या बी बियाण्यांची लागवड केली जाते. खते व कीटकनाशक औषधांचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. आवश्यक असेल त्या ठिकाणी यांत्रिक अवजारांचाही उपयोग केला जातो. भारतात कुशल व अकुशल मजूर मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. मळे अनेक गोष्टीनी सुसज्ज आहेत. मळयांत स्वतंत्र वसाहती, प्रयोगशाळा व संशोधन केंद्रे आहेत. जगातील सर्वात मोठे चहाचे संशोधन केंद्र आसाममध्ये 'टोकलाई' येथे आहे.भारतात मळयाच्या शेतीत जी उत्पादने मिळतात त्यांपैकी बरीच पिके विशेष प्रकारच्या प्रक्रिया करून निर्यात केली जातात.आंतरर्राष्ट्रीय बाजारपेठेत बऱ्याच राष्ट्रांशी भारताला स्पर्धा करावी लागते. त्यामुळे मळयाच्या शेतीतील उत्पादनांची प्रत उत्तम ठेवणे आवश्यक असते.

**मळयाच्या शेतीतील समस्या**

१) भारतातील बरेचसे मळे पर्वतउतारावर आहेत. तेथे पावसाचे प्रमाण जास्त आहे; त्यामुळे जमिनीची धूप मोठ्या प्रमाणावर होते. त्यासाठी योग्य ती काळजी घेणे आवश्यक असते.

२) मळयाच्या शेतीत अनेक मजूर काम करीत असल्याने अनेक कारणांमुळे त्यांच्यात कलह वा मतभेद होतात; त्यामुळे उत्पादनास खीळ बसते.

३) काही वेळेस अचानक उष्णतेच्या किंवा थंडीच्या लाटा येतात. अवेळी पाऊस पडणे, वादळ येणे, हवामानात अचानक बदल होणे, पिकांवर कीड पडणे वगैरे कारणांमुळे पिकांच्या उत्पादनावर व प्रतीवर विपरीत परिणाम होतो. अनेकदा इतरही काही नैसर्गिक आपत्ती ओढवतात.

४) मळयाच्या शेतीतील चहा, कॉफी, रबर यांसारख्या पिकांच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील किमतींत चढउतार होत असतात. त्यामुळे परकीय चलनातील उत्पन्न अनिश्चित स्वरूपाचे असते.

- **विस्तृत व्यापारी धान्यशेती**

शेतीचा हा प्रकार देशात अलीकडच्या काळातच रूढ होऊ लागला आहे. विकसित राष्ट्रांत या प्रकारची शेती मोठ्या प्रमाणावर प्रचलित आहे. या पद्धतीच्या शेतीतील फायदे लक्षात घेऊन भारतातही काही प्रदेशांतील शेतकऱ्यांनी विस्तृत व्यापारी धान्यशेती स्वातंत्र्योत्तर काळात सुरू केली आहे. इ. स. १९६५-६६ व नंतरच्या काळातील हरितक्रांतीच्या पार्श्वभूमीवर पंजाब, हरियाणा, गुजरात, विभाजनपूर्व उत्तर प्रदेश व विभाजनपूर्व मध्य प्रदेश यांसारख्या राज्यांत विस्तृत व्यापारी धान्यशेतीला प्रारंभ झाला. गहू, तांदूळ व अन्नधान्योत्पादनात देशास आत्मनिर्भर बनविण्याच्या दृष्टिकोनातून या प्रकारच्या शेतीस विशेष प्रोत्साहन दिले गेले. कायद्याची मदत

घेऊन शेतीचे आकार मोठे केले गेले. मुख्यत्वे व्यापारी दृष्टिकोनातून केल्या जाणाऱ्या या शेतीत यांत्रिक अवजारांचा वापर करणे आवश्यक होते. शेतीचे आकार मोठे केल्याने ते शक्यही झाले. अधिक उत्पादन हेच ध्येय असल्याने व आर्थिक लाभ नजरेसमोर असल्यामुळे या प्रकारच्या शेतीत खतांचा व कीटकनाशकांचा वापरही मोठ्या प्रमाणावर केला जातो. सुधारित बियाण्यांचा वापर करून हेक्टरी अधिकाधिक उत्पन्न मिळविण्याला प्राधान्य दिले जाते. गहू हे या प्रकारच्या शेतीतून घेतले जाणारे प्रमुख पीक आहे.

- **व्यापारी मिश्रशेती**

सखोल उदरनिर्वाह शेतीबरोबरच काही प्रमाणात व्यापारी दृष्टिकोन ठेवून ही शेती केली जाते. त्यामळे अशा स्वरूपाच्या शेतीस 'व्यापारी मिश्रशेती' असे म्हटले जाते. अशा प्रकारच्या शेतीत शेताच्या काही भागांत उदरनिर्वाहाच्या दृष्टिकोनातून धान्योत्पादन घेतले जाते, तर काही भागात व्यापारी दृष्टिकोनातून ऊस, कापूस, तंबाखू, द्राक्षे यांसारखी नगदी पिके घेतली जातात. बदलत्या काळाबरोबर व्यापारी दृष्टिकोन अधिक प्रमाणावर डोळ्यासमोर ठेवला जात आहे. कमी पावसाच्या प्रदेशातही जलसिंचनाची सुविधा निर्माण झाल्यामुळे मिश्र व्यापारी शेतीकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे.

- **कोरडवाहू शेती**

मोसमी पावसावर अवलंबून असणारी उदरनिर्वाहासाठी पारंपरिक पद्धतीने केली जाणारी शेती होय. भारतातील कमी पावसाच्या प्रदेशात मुख्यतः दख्खनच्या पठारावर व पर्जन्यछायेच्या प्रदेशात या प्रकारची शेती केली जाते. पाण्याचा अभाव असल्याने खोल नांगरट करणे, पाऊस पडून गेल्यावर ओल्या जमिनीवर गवत पसरणे यांसारख्या पद्धतीने जमिनीचा ओलावा टिकवून ठेवण्याचे प्रयत्न केले जातात. पूर्णपणे निसर्गाधीन असलेल्या व अनिश्चित स्वरूपाच्या या शेतीतून ज्वारी, बाजरी, नाचणी, नागली यांसारखी उत्पादने घेतली जातात.

- **मंडई बागायती शेती**

औद्योगिकीकरणाच्या व नागरीकरणाच्या युगात मंडई बागायती शेतीचा विकास झाला आहे . शेतीचा हा प्रकार अलीकडील काळात विकसित झाला आहे. या शेतीमध्ये शेतातील माल जवळपासच्या शहरांना मालमोटारीमार्फत पाठविला जातो. मंडई बागायती ही प्रामुख्याने कारखानदारी आणि व्यापार भरभराटीला आलेल्या प्रदेशात केली जाते. हा प्रकार शहरीकरणामुळे उदयास आला आहे. यामध्ये मोठ्या शहराभोवतालच्या ग्रामीण भागात भाजीपाला, फळे, फुले, यांची लागवड केली जाते. शहरातील लोकांची क्रयशक्ती जास्त असते. या लोकांकडून ताज्या भाज्या, फळे, फुले, दूध, दुधाचे पदार्थ, अंडी यांना मोठी मागणी असते. त्यामुळे भाज्या, फळे आणि फुले मोठ्या प्रमाणात पिकविली जातात. त्याचबरोबर पशुपालनही केले जाते. त्यामुळे दूध, दुधाचे पदार्थ तसेच अंडी यांचेही उत्पादन होते. ही शेते प्रामुख्याने शहराजवळ असल्यामुळे जमीन स्वस्त नसते. शेतांचा आकार लहान असतो. जमिनीचा सखोल वापर करण्यात येतो. ही शेते रस्ते, रेल्वेमार्ग, जलमार्ग आणि विमान वाहतुकीने बाजारपेठेशी जोडलेली असतात. एका अर्थाने ही व्यापारी शेती असून संबंधित परिघातील शहर हेच या कृषी उत्पादनांची प्रमुख बाजारपेठ असते.

**निष्कर्ष**

भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा शेतीची फारच दुरवस्था होती. त्यातच त्या वेळी भारताचे विभाजन होऊन बराच सुपीक व बागायती प्रदेश पाकिस्तानमध्ये गेला. याउलट निर्वासितांच्या लोंढ्यामुळे भारतातील खाणाऱ्या तोंडांची संख्या मात्र वाढली. त्यामुळे वाढत्या प्रमाणावर अन्नधान्याची आयात करण्याची पाळी आपल्यावर आली. या सर्व परिस्थितीची जाण ठेवून नियोजन मंडळाने आपल्या पहिल्या पंचवार्षिक योजनेपासूनच शेतीला अग्रक्रम दिला. नियोजनाच्या प्रमुख उद्देशात सुरुवातीपासूनच शेतीचे उत्पादन वाढविणे, ग्रामीण रोजगारीत वाढ करणे, ग्रामीण भागातील उत्पन्नातील विषमता कमी करणे यांवर भर देण्यात आला आहे.भारतातील शेतीव्यवसायाच्या अनेक समस्या आहेत. असे असले तरी स्वातंत्र्योत्तर काळात भारताने शेतीव्यवसायात लक्षणीय प्रगती साध्य केली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील शेतीमध्ये महत्त्वाचे बदल घडून आले आहेत. लागवडीखालील क्षेत्र, दरहेक्टरी उत्पादन, एकूण कृषी उत्पादन, नगदी पिकांचे उत्पादन, जमिनीची उत्पादकता इत्यादी प्रमुख घटकांत सातत्याने वाढ होत आहे.

भारतातील शेती प्रामुख्याने मोसमी पावसावर अवलंबून आहे. पाऊस कमी झाल्यास शेती-उत्पादनावर विपरीत परिणाम घडून येतो. म्हणून जलसिंचनाच्या सोयी करण्यात आल्या आहेत. १९५०-५१ साली लागवडीखालील क्षेत्रापैकी फक्त २.९ टक्के क्षेत्रात जलसिंचनाची सोय उपलब्ध होती. आता ५१ टक्के क्षेत्रास जलसिंचनाद्वारे पाणी पुरविले जाते. हरितक्रांतीनंतर तर भारतीय शेतीमध्ये महत्त्वपूर्ण बदल घडून आले आहेत. शेतकऱ्यांना पतपुरवठा करण्यासाठी अनेक सहकारी संस्था व बँका पुढाकार घेत आहेत. शेती-उत्पादन

वाढविण्यासाठी सरकारने अनेक प्रकारच्या योजना व प्रोत्साहनपर अनुदाने देण्यास सुरुवात केली आहे. शेती-उत्पादनात वाढ व्हावी व उत्पादनाची प्रत चांगली राहावी म्हणून सरकार व इत्तर संस्था स्थानिक पातळीवर, राष्ट्रीय पातळीवर व आंतरराष्ट्रीय पातळीवर शेतमालाचे व विकसित कृषिउपयोगी अवजारांची प्रदर्शने भरवितात.स्थानिक पर्यावरणाच्या गरजांनुसार विविध प्रकारच्या आणि वैशिष्ट्यांच्या नवनवीन संकरित बी-बियाण्यांचा सरकारी व सहकारी संस्थांमार्फत विकास करण्यात आला आहे. कृषी विद्यापीठेही या बाबतीत पुढाकार घेत आहेत. यासाठी जैव तंत्रज्ञान, ऊतिसंवर्धन आणि गुणसूत्र अभियांत्रिकी यांचा उपयोग करण्यात येत आहे. त्यामळे उत्पादनात भरघोस वाढ साध्य झाली आहे. भारताने अन्नधान्याच्या उत्पादनात स्वयंपूर्णता मिळविली आहे. आज एकूण लागवडीखालील क्षेत्रापैकी सुमारे ६२ टक्के क्षेत्रात अन्नधान्याच्या आधुनिक जातींची लागवड केली जाते. आपल्या प्रत्येक पंचवार्षिक योजनेत शेती व जलसिंचन या क्षेत्रास प्राधान्य देण्यात आले होते. पंचवार्षिक योजनांत शेतीला सुरुवातीपासूनच प्राधान्य दिले गेल्यामुळे व अनेक योजना वा कार्यक्रम राबविल्यामुळे कृषिक्षेत्रात लक्षणीय प्रगती झाली आहे. बहुतांशी पिकांच्या उत्पादनात वाढ घडून आली. एकूण अन्नधान्य उत्पादनात भरघोस वाढ झाली आणि कृषी क्षेत्राने 'हरितक्रांती' पाहिली. देश अन्नधान्यात स्वयंपूर्ण झाला. या काळात जलसिंचन क्षेत्रात वाढ घडून आली. आज संकरित बी-बियाणे, रासायनिक खते, कीटकनाटके इत्यादींच्या वापरातही लक्षणीय वाढ झाली. शेतीसंलग्न क्षेत्र म्हणजे पशुसंवर्धन,दुग्धोत्पादन या क्षेत्रांतही भरघोस प्रगती होऊन 'धवल-क्राती' उदयास आली. फळपिकांच्या विकासासाठी महाराष्ट्र व इतर राज्यांतून नवीन योजना वा कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. नजीकच्या काळात फलोत्पादनातही प्रचंड वाढ होऊन या क्षेत्रात 'पीतक्रांती' दृष्टिक्षेपात येईल अशी अपेक्षा आहे.भारताचा विस्तीर्ण विस्तार, प्राकृतिक रचनेतील विविधता, हवामानांतील विविधता, मृदेच्या सुपीकतेतील भिन्नता इत्यादींमुळे भारतात अनेक प्रकारची पिके घेतली जातात. देशातील लागवडीखालील एकूण क्षेत्राच्या ६७ टक्के क्षेत्र अन्नधान्य पिकांनी व्यापलेले आहे. अन्नधान्य पिकांत भात, गहू आणि ज्वारी यांनी अधिक क्षेत्र व्यापले आहे.

**संदर्भ ग्रंथ**

1.Agarwal A.N. - Indian Economy.
2. Agarwal N.C. - The Food Problem of India.
3. Datta, Sudaram - Indian Economy.
4. Govt. of India. -India 2011.
5. Govt. of India - Economic Survey of India
6. I.C.A.R. - Handbook of Agriculture
7. Mamoria C.B. - Geography of India.
8. Singh Gopal - Geography of India.
9. सारंग सुभाषचंद्र - महाराष्ट्राचा भूगोल
10. मगर जयकुमार. - भारताचा भूगोल
11. डोईफोडे हिरालाल.- महाराष्ट्र लोकसेवा आयोग